# कार्यकारी सारांश

## १) प्रस्तावना

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण १९७५ या वर्षी स्थापन झाले. दीर्घकालीन नियोजन, नवीन वृद्धी केंद्रे विकसित करणे, धोरणात्मक प्रकल्पांची अंमलबजावणी, आणि पायाभूत प्रकल्पांना वित्तपुरवठा करणे ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियत कार्ये आहेत. मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीत मुख्य मार्गावरील प्रवासी वाहतुकीचे विस्तारित मार्ग, बस सेवा, सार्वजनिक चारचाकी (टॅक्सी ) सेवा आणि सार्वजनिक तिचाकी (रिक्षा) सेवा तसेच फेरी नौकांची सेवा यांचा समावेश आहे. अस्तित्वातील उपनगरी रेल्वे प्रणालीशी जोडल्या न गेलेल्या भागातील रहिवाशांना उपनगरी रेल्वे स्थानकांपासून १ किमी हून कमी अंतरावर पोचण्यासाठी सोयीचे व्हावे म्हणून मुंबई मेट्रो (महानगरी सेवा) रेल्वे बृहत् आराखडा (master plan) तयार करण्यात आला आहे.मुंबई मेट्रो रेल्वे बृहत् आराखडयात ३३७.१ किमी. लांबीचे १४ मेट्रो मार्ग आखले असून ते भूमिगत मार्ग आणि उन्नत मार्ग या दोन्ही प्रकारातील आहेत. मुंबई मेट्रो मार्ग - ०५ हा प्रस्तावित मार्ग ठाणे आणि कल्याण दरम्यान भिवंडीमार्गे आखलेला आहे आणि तो ज्या भागांना जोडेल त्या भागातील वाहतूक कोंडी कमी होऊन तेथील सार्वजनिक वाहतूक सुविधांमध्ये सुधारणा होणे अपेक्षित आहे.

मुंबई मेट्रो मार्ग - ०५ मध्ये २४.९० किमी चा उन्नत पूलरूप मार्ग (viaduct) समाविष्ट असून त्यावर १४ स्थानके आणि एक आगार असेल. या प्रणालीत वाहतुकीचे चाकांसह डबे (rolling stock), वहन निर्देश (signal) यंत्रणा, दूरसंज्ञापन (telecommunication) यंत्रणा, फलाटावरील दृश्यपटल (screen) दरवाजे, विद्युत आणि यांत्रिकी प्रवास भाडे संकलन प्रणाली, उंचावरील उपकरणे, कर्षण (traction) व्यवस्था, वीजपुरवठा आणि पर्यवेक्षकीय नियंत्रण आणि विदा संपादन (SCADA) प्रणाली, उद्वाहने, सरकते जिने व आगार यंत्रसामुग्री आणि संयंत्रे यांचा अंतर्भाव असेल. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संपूर्ण मुंबई मेट्रो मार्ग - ०५ प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये विभागला आहे. टप्पा – १ मध्ये ठाणे (कापूरबावडी) ते भिवंडी (धामणकर नाका) हा ११.८५ किमी लांबीचा पूलरूप मार्ग (viaduct) समाविष्ट असून त्यावर ६ स्थानके आणि कशेळी येथील एक आगार (depot) व अनुषंगिक सुविधा

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध आहे.

असतील. टप्पा – २ मध्ये भिवंडी (धामणकर नाका) ते कल्याण (कल्याण कृषी उत्पन्न समिती) हा १३.०२ किमी लांबीचा मार्गावर काही भागात पूलरूप मार्ग (viaduct) आणि ३.५ किमी भुयारी मार्ग समाविष्ट असून त्यावर ७ उन्नत मेट्रो स्थानके असतील आणि १ भुयारी स्थानकअसेल. मुंबई मेट्रो मार्ग – ०५ च्या प्रणाली आणि घटक यासाठी वित्तपुरवठा करण्यासाठी एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संपर्क साधला आहे.

## २) पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी (due diligence) अहवालाची (ESDDR) गरज

या मुंबई मेट्रो मार्ग – ०५ ची प्रणाली, वहन निर्देश (signal) यंत्रणा, चाकावरील डबे यासाठी एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकवित्तपुरवठा करीत आहे. उन्नत मेट्रो मार्ग बांधकामात इतर घटकांचा समावेश होत असल्याने, ते घटक (त्या घटकांना एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकनिधी देत नसेल तरी) प्रकल्पाचे भाग आहेत आणि ते एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेच्या पर्यावरण व सामाजिक धोरणात बसतात म्हणून पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणीचा विचार केला आहे वपर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवाल तयार केला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अगोदर मुंबई मेट्रो मार्ग – ०५ च्या टप्पा – १ ची अंमलबजावणी हाती घेतली आहे आणि ७ जून २०२३ पर्यंत ७८.२९% स्थापत्य काम (पूलरूप मार्गासह) पूर्ण केले आहे.

पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवाल प्रकल्पाच्या पर्यावरणीय, सामाजिक, आरोग्य व सुरक्षितता स्थिती आणि कामगिरी यांचे मूल्यांकन करतो तसेच पूर्ततेतील तफावत शोधतो. हा अहवाल स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वैधानिक कायदेकानू तसेच एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेची पर्यावरणीय सामाजिक चौकट यांच्याशी सुसंगत रीतीने कामाची पूर्तता होण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचवतो. हा अहवाल तयार करताना वापरलेल्या कार्यपद्धतीत प्रकल्पाच्या कागदपत्रांचे पुनरावलोकन , हितसंबंधियांशी विचारविनिमय, जमा केलेली विदा (data)/ माहिती यांचे विश्लेषण, पर्यावरणीय व सामाजिक जोखमी आणि आघात निश्चित करणे, पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध आहे.

विषयक उपाय, पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवाल तयार करणे, प्रारूप ऊद्दिष्टी (output)/ सुधारणात्मक कृती याबाबत चर्चा, पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवाल अंतिम करणे, पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवाल प्रसिद्ध करणे हे टप्पे असतात.

### ३) प्रकल्पाची वैशिष्टे

मुंबई मेट्रो मार्ग ०५–टप्पा – १ ची सुरुवात कापूरबावडी स्थानक (Ch – ०.३२१४५४) पासून होते आणि हे स्थानक मुंबई मेट्रो मार्ग ०४ या प्रकल्पाचा एक भाग म्हणून बांधले जाईल कारण तिथे मुंबई मेट्रो मार्ग ०५ व मुंबई मेट्रो मार्ग ०४ हे दोन मार्ग एकमेकांना छेदतात आणि मुंबई मेट्रो मार्ग ०५ – टप्पा – १ चा शेवट भिवंडी (धामणकर नाका) (Ch – १२.२००Km.) येथे होतो. या टप्प्याचे संरेखन (alignment) नियोजित कापूरबावडी स्थानक येथून सुरू होते,आणि कापूर बावडी उड्डाण पुलावरून पुढे राज्य महामार्ग ८४ च्या कडेने (ठाणे – भिवंडी – वडपा रस्ता) वर्तुळाकर पुढे जाते. हे संरेखनपुढे Ch. ३४०० ते ३९०० दरम्यान कशेळी खाडी ओलांडते आणि अस्तित्वातील पुलाच्या बाजूने पुढे जाते. पुलापासून पुढे हे संरेखन भिवंडी ते ठाणे रस्त्याच्या कडेकडेने पुढे जात धामणकर नाका येथे त्याचा शेवट होतो. या संरेखनाचा बहुतांश भाग (९०% हून अधिक) अस्तित्वातील रस्त्यांच्या मध्य भागातून जात आहे. प्रकल्पाचे संपूर्ण क्षेत्र शहरी पट्ट्यात आहे आणि त्या क्षेत्रात दाट लोकवस्ती आहे.

### ४) नियामक चौकट- पर्यावरणीय

तार्किकदृष्ट्या, प्रकल्पाला लागू असणारी राज्याची पर्यावरण विषयक धोरणे, संबंधित कायदे व नियमावली या बाबी पुढीलप्रमाणे आहेत; पर्यावरणीय (संरक्षण) अधिनियम १९८६, जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम १९७४, हवा (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम १९८१, ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम २०००, घातक आणि इतर कचरा (व्यवस्थापन आणि सीमापार वाहतूक) नियम २०१६, घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, बांधकाम आणि पाडकाम कचरा नियम २०१६, वन (संवर्धन) अधिनियम १९८०, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२, किनारा नियमन क्षेत्र अधिसूचना २०११, इमारत आणि अन्य बांधकाम कर्मचारी (रोजगार आणि सेवा अटी नियमन) अधिनियन १९९६, ठेकेदारी कामगार प्रथा (नियमन आणि निर्मूलन ) अधिनियम १९७०, कामगार भरपाई अधिनियम १९२३ इ.

पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणीनुसार पुढील नियमावल्या पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवालात जोडणे आणि आवश्यक परवानग्या मिळवणे आवश्यक आहे.

१ ] मुंबई मेट्रो मार्ग ०५ मध्ये वीज पुरवठा आणि कर्षण (traction) प्रणाली, विद्युत आणि यांत्रिकी प्रणाली, ऊद्वाहन (lift) व्यवस्था आणि सरकते जिने या रूपाने विद्युत प्रणालींचा समावेश असल्याने विद्युत विषयक नियमावली, विशेषत: सुरक्षेशी संबंधित नियमावली.

२ ] जुन्या रुपांत्रकात (transformer) असलेल्या पॉलिक्लोरिनेटेड बायफेनिल्स सह सातत्यपूर्ण सेंद्रिय प्रदुषके असतात आणि अशा घातक पदार्थविषयक आंतरराष्ट्रीय परिषदेतील ठराव.

३ ] स्विचगिअर / आरएमयू मधील क्रियाशील जीएचजी म्हणून वापरले जाणारे एसएफ ६ या सारख्या वातावरणातील उत्सर्जकांबाबत आंतरराष्ट्रीय परिषदेतील ठराव.

४ ] मेट्रो रेल प्रणालीबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची धोरणे आणि त्या संबंधित कार्यदर्शिका.

५ ] जागतिक बँकेच्या पर्यावरणीय, आरोग्य आणि सुरक्षितता विषयक मार्गदर्शक सूचना.

६ ] परवानग्या व मान्यता अद्ययावत करणे / त्यांचे नूतनीकरण करणें आणि त्यांच्या इंग्लिशमध्ये भाषांतरित केलेल्या प्रती बँकेला देणे.

### ५) प्रकल्पाचा आघात (Impact)- पर्यावरणीय

हवा, पाणी, जमीन, कचरा निर्मिती, पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवालाच्या यादीत नोंदविलेल्या आघाताशिवाय, प्राणी आणि वनस्पती जीवन, ध्वनी, कंपने, आरोग्य व सुरक्षितता, ऊर्जा, इ. शी संबंधित जे आघात पर्यावरणीय आघात मूल्यांकन यादीत आहेत, त्याशिवाय, पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवालात प्रकल्पाचे परिचालन (operation) करताना होणाऱ्या ध्वनी व कंपने संबंधित आघातांचाही विचार केला आहे, कारण मुंबई मेट्रो मार्ग ०५ चे संरेखन कापूरबावडी येथील रहिवासी भाग आणि व्यापारीआस्थापना क्षेत्रातून जात आहे. पूलरूप मार्गाची कड कापूरबावडी येथील सर्वात जवळच्या रहिवासी / व्यापारी इमारतीपासून ३ मी. अंतरावर आहे.

पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवालात सुचवले आहे की, मुंबई मेट्रो मार्ग ०५ च्या परिचालनामुळे होणाऱ्या या ठिकाणच्या ध्वनी व कंपने संबंधित आघातांचे मूल्यांकन केले जावे. या ठिकाणच्या ध्वनी व कंपने संबंधित आघातांच्या संदर्भात ध्वनी व कंपने यांचा आघात टाळणे / अडविणे / शमविणे यासाठी ठिकाण निहाय आणि सुयोग्य उपाय प्रस्तावित केले पाहिजेत व त्यांचा समावेश पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यात केला पाहिजे तसेच त्यांची जागेवर अंमलबाजवणी झाली पाहिजे.

## ६) पर्यावरणीय व सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवालातील निष्कर्ष- पर्यावरण

पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवालात म्हटले आहे की, कामाच्या ठिकाणी पुढील बाबींचा अभाव आहे. [ अ ] योग्य संरक्षक अडथळे, सूचना पाट्या, भंगार / साठवण क्षेत्रे, कामकाजासाठी जागा, कामासाठी टेकूपाट (टेबल), विश्रांती / न्याहरी / जेवण यासाठी जागा, सुरक्षा चौक्या इ. [ ब ] योग्य भू - संपर्क (earthing), जड यंत्रांच्या परिचालनासाठी निरीक्षक इ. आरोग्य आणि सुरक्षितता तरतुदी. [ क ] योग्य साफसफाई (housekeeping) व्यवस्था.

ओतकाम केंद्रातील (casting yard) मधील कामगार शिबिराला भेट दिली असता तो भाग चांगल्या स्थितीत आढळला.

दि. १८ मे २०२१ च्या प्राणघातक घटनेच्या संदर्भात, पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवालात म्हटले आहे की, तपासणी अहवालात अपघाताच्या मूळ कारणांचे विश्लेषण असले पाहिजे असे अपघात टाळण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजनांची शिफारस असली पाहिजे. सर्वसाधारण सल्लागाराने अगोदर अहवालाची पुष्टी केली पाहिजे आणि शिफारस केलेल्या सुरक्षितता उपायांची अंमलबजावणी केली आहे आणि ते उपाय कार्यरत आहेत. बळींच्या जवळच्या नातेवाईकांना अदा केलेल्या रकमेचा आणि अदा केलेल्या दिनांकाचा तपशील दिलेला नाही.

प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवालात म्हटले आहे की, स्थापत्य कामांच्या ठेकेदाराने लेखापरीक्षण अभिकर्ते नेमले आहेत. ठेकेदार आणि सर्वसाधारण सल्लागाराशिवाय संनियंत्रण अभिकर्ते (monitoring agency) वेगळे असण्याची आवश्यकता आहे.

---

प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवालात म्हटले आहे की, पर्यावरणीय सुरक्षितता उपाय आणि पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण  यात प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे केवळ एक स्थान आहे. सर्वसाधारण ठेकेदाराचेही केवळ एक स्थान आहे तर ठेकेदारचे एक स्थान आहे. यासाठी पर्यावरणीय आणि सामाजिक सुरक्षितता उपाय व पर्यावरण व्यवस्थापन आराखडा आणि पुनर्वसन कृती आराखडा यांचे तिमाही संनियंत्रणआणि मध्यावधी (mid- term) तसेच कालावधीच्या अखेरीस (end – term) मूल्यमापन करण्यासाठी बाह्य संनियंत्रण अभिकरणाची आवश्यकता आहे.

## ७) सुधारणात्मक कृती आराखडा- पर्यावरण

प्रकल्पातील स्थापत्य कामे जवळजवळ पूर्ण होत आली असून उरलेली स्थापत्य कामे आणि रुळांचे काम तसेच विद्युत आणि यांत्रिकी कामे यांचे, पर्यावरणीय आणि सामाजिक संनियंत्रण तसेच आरोग्य आणि सुरक्षितता संनियंत्रणकरण्याचा भरीव अनुभव आणि कौशल्य असलेल्या स्वतंत्र अभिकरणाकडून बारकाईने आणि वारंवार संनियंत्रण करणे आवश्यक आहे.  उरलेले काम विशेषत: उंचावर आणि बंदिस्त ठिकाणांवर असून त्यातील बहुतांश भाग विद्युत संबंधी असल्याने याची विशेष आवश्यकता आहे. पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवाला अंतर्गत प्रस्तावित सुधारणात्मक कृती आराखड्यात पुढील बाबींचा समावेश आहे. [ अ ] प्रकल्प पर्यावरणीय आघात मूल्यांकनात सुचविल्याप्रमाणे सुधारणा करून ते अद्ययावत करणे [ ब ] प्रलंबित मान्यता / परवानग्या मिळविणे [ क ] मान्यतांचे इंग्लिश भाषांतर करणे [ ड ] प्रकल्पापासून 10 किमी अंतरातील संरक्षित क्षेत्रांवर होणाऱ्या आघातांचे मूल्यांकन करणे  [ इ ] ध्वनी व कंपने यामुळे होणाऱ्या आघातांचे मूल्यांकन करणे आणि त्यानुसार पर्यावरण व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करणे [ फ ] पर्यावरण व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करणे [ ग ] ठेकेदारांच्या कामाच्या ठिकाणांची तपशीलवार छाननी करणे आणि त्याचा अहवाल तयार करणे [ ह ] ठेकेदाराच्या पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यात कामगारांसाठी तक्रार निवारण यंत्रणा उभारण्याचा समावेश करणे[ ऐ ] विविध प्रसंगाविषयी कामगार विवरणपत्रेत्रांचा (labour returns) अहवाल सादर करणे  [ ज ] स्वतंत्र लेखापरीक्षकाच्या संदर्भ अटींचा आढावा घेणे आणि त्यांचा रोख

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध  आहे.

सुरक्षितता मुद्यांवर असेल असे पाहणे [ ल ] संनियंत्रणआणि मूल्यमापन यासाठी बाह्य अभिकरणाची योजना करणे.

## ८) नियामक चौकट अणि परिणामांचे मूल्यांकन - सामाजिक

भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत या सामाजिक परिणामांसाठी लागू असलेल्या कायदेशीर आणि नियामक आवश्यकता या भूमी संपादन, पुनर्वसन व पूनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचे पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण यांच्याशी संबंधित असून यातील तरतूदी तसेच सामाजिक परिणाम मूल्यांकन व पुनर्वसन कृती आराखडा यात प्रस्तावित केलेल्या उपाययोजना यांच्यासह एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँकेच्या पर्यावरणीय आणि सामाजिक चौकटीची पूर्तता होईल.

हा प्रकल्प जरी मुख्यत्वे शहरी वस्तीत कार्यान्वित होत असला तरी त्याचे बहुतांशी संरेखन रहदारी हक्क असलेल्या अस्तित्वातील रस्त्याच्या हद्दीत (RoW) ठेऊन भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत परिणाम कमीत कमी राखले असून रचना बदलून, विशेषत: स्थानकांतील प्रवेश आणि निर्गमन रचनांमध्ये बदल करुन (९४ बांधकामांवरील प्रवेश परिणाम टाळले आहेत) असे परिणाम आणखी कमी केले आहेत. प्रकल्प सामाजिक परिणाम मुल्यांकन व पुनर्वसन कृती आराखडा अहवाल तयार केला असून त्यामध्ये परिणामातील बदल, सर्व्हेक्षणातून आता उपलब्ध नवीन माहिती, उपजिविका आणि उत्पन्न पुन:स्थापना आराखड्याचा समावेश, बाह्य संस्थेकडून संनियंत्रणाची तरतूद, इत्यादीबाबत एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँकेने घेतलेल्या आढाव्याच्या आणि त्यांनी कळविलेल्या मुद्यांच्या आधारे सद्यस्थितीत सुधारणा करण्यात येत आहे.

## ९) भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत परिणाम आणि सद्यस्थिती

प्रकल्पाचे बांधकाम ऑगस्ट २०१९ ला सुरु झाले आणि ज्या भागात खासगी जमिनीचे संपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत करावे लागणार नाही अशा भागात एकूण प्रकल्पाचे ७८.२९% बांधकाम पूर्ण झाले आहे. प्रकल्पाच्या कामाने बाधित होणाऱ्या कोणत्याही खासगी जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया अद्याप

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध आहे.

पूर्ण व्हायची असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने चार प्रकल्प बाधित ठिकाणच्या १०९ ताबाधारक कुटुंबे / वाणिज्य आस्थापना यांचे पुनर्वसन केले आहे.

प्रकल्पासाठी सध्या रहदारी हक्क असलेल्या (RoW) जमिनी वगळून एकूण ३५.४१ हे. जमीन आवश्यक असून त्यातील २९.२६ हे. जमीन कायमस्वरुपी आवश्यक आहे आणि कामाच्या ठिकाणचे कार्यालय आणि कास्टिंग यार्ड यासाठी ६.१५ हे. जमीन आवश्यक आहे. कायम स्वरुपी आवश्यक जमिनींपैकी २७.२५ हे. खासगी जमीन (ज्यात आगारासाठी ५८ जमीन मालकांच्या मालकीची २६.७३ हे. जमीन आहे) आणि २.०१ हे. सार्वजनिक जमीन आवश्यक आहे. २६.८१ हे. खासगी जमीन संपादनाचे प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर केले आहेत आणि त्यांची प्रक्रिया सुरु असून उर्वरित ०.४४ खासगी जमीन संपादनाचे प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करण्यासाठी तयार केले जात आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या बहुतांशी सार्वजनिक जमिनिंवर काम करण्याची परवानगी मिळवलेली आहे.

प्रकल्पामुळे एकूण २९२ बांधकामे ( १०८ निवासी आणि १८४ वाणिज्य ) बाधित झाली आहेत. एकूण १५९ बांधकामे खासगी जमिनीवर आहेत आणि त्यातील ६७ बांधकामे कापूरबावडी येथील पुलावरील मार्गाने बाधित झालेल्या औपचारिक इमारतींमधील असून उर्वरित ९२ बांधकामे निम पक्क्या स्वरुपात असून ती बहुधा जमीन मालकी नसलेल्या धारकांच्या ताब्यातील (ज्यांची कायदेशीर जमिन मालकीबाबत खातरजमा झालेली नाही) आहेत. बाधित २९२ बांधकामांतील ताबाधारक आणि आगाराच्या जमिनीचे ५८ जमीन मालक, यापैकी १४५ जण गरीबी, सामाजिक मागासलेपण किंवा महिला कुटुंबप्रमुख असल्याने असुरक्षित (Vulnerable) असल्याचे दिसून येते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १०९ प्रकल्प बाधित व्यक्तींचे (३१ निवासी आणि ७८ वाणिज्य) त्यांच्या प्राधान्यानुसार जवळच्या भाडे तत्वावरील घरे योजनेच्या वसाहतीत पूनर्वसन केले असून ७८ व्यापारी प्रकल्प बाधित व्यक्तींपैकी ६३ जणांनी त्यांच्या दुकानांच्या जागेच्या बदल्यात निवासी सदनिका स्विकारण्याचा पर्याय निवडला आणि उरलेल्या १५ जणांनी पर्यायी दुकानाची जागा पुनर्वसनासाठी निवडली आहे.

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध आहे.

## १०) पात्रता आणी हक्क

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विविध संभाव्य प्रकल्पबाधित व्यक्ती, ज्यात (अ) खाजगी जमिनींचे मालक, (ब) खाजगी जमिनिंवरील बांधकामात वास्तव्य असलेले मालक / औपचारिक भाडेकरु, (क) खाजगी जमिनीवरील अतिक्रमणाच्या स्वरुपातील बांधकामात वास्तव्य करणारे, व (ड) सार्वजनिक जमिनीवरील अतिक्रमणाच्या स्वरुपातील बांधकामात वास्तव्य करणारे, यांचा समावेश आहे, अशांसाठी भमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचे पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण यातील तरतूदींनुसार एका विस्तृत मोबदल्याची आखणी (Entitlement Matrix) विकसीत केली आहे. यात हक्क मिळण्याबाबत अर्हता दिनांकही (कट ऑफ डेट) विहित केले आहेत. सदर मोबदल्याची आखणी राष्ट्रीय अधिनियम, राज्याची धोरणे आणि एशियन इन्फ्रास्ट्रक्चर बँकेची पर्यावरणीय आणि सामाजिक चौकट व पर्यावरण आणि सामाजिक मानके-२: भूसंपादन व अनैच्छिक पुनर्वसन, यांची पूर्तता करेल अशी आहे.

## ११) सल्लामसलत आणि माहिती प्रकटीकरण (Disclosure)

पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन आणि सामाजिक परिणाम मूल्यांकन अहवाल तयार करण्याचे काम हाती घेण्यापूर्वी सार्वजनिक सल्लामसलत करणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला, मुख्यत: कोविड १९ शी संबंधित प्रतीबंधामुळे, शक्य झाले नव्हते. प्रकल्पाच्या स्थापात्य कामांमध्ये ७८.२९ % प्रगती साध्य झाली असली तरी आगार, आगार प्रवेश / निर्गमन, कापूरबावडी चौकातील पुलावरील मार्ग आणि काही स्थानकांचा तसेच त्यांच्या प्रवेश / निर्गमन रचना यांच्या बांधकामांचा नुकताच प्रारंभ होणार असल्याने भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत यावर त्यांचा होणारा भौतिक परिणाम विचारात घेऊन प्राधिकरणाने आता १२ मे, २०२३ रोजी सार्वजनिक सल्लामसलत कार्यक्रम आयोजित केला होता. याशिवाय, स्थलांतर होणार आहे अशा ठिकाणच्या प्रकल्प बाधित व्यक्तींशी आणि आगाराच्या जागेच्या जमीन मालकांशी विशेष सल्लामसलत केली आहे. भविष्यात , ज्या इतर प्रकल्प बाधित व्यक्तींचे स्थलांतर अजून होणार आहे त्यांच्याशीही अशा प्रकारे सल्लामसलत करणे प्रस्तावित आहे. तसेच प्राधिकरणाने सल्लामसलत करताना सर्व प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटण्यासाठी वेगवेगळया भाषांमधून (मराठी, हिंदी व इंग्रजी)

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध आहे.

प्रकल्पाची मुलभूत वैशिष्ट्ये, संभाव्य सामाजिक परिणाम, भूसंपादन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत यांची चौकट, पात्रता आणि हक्क, तक्रार निवारण यंत्रणा (एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँकेच्या प्रकल्पबाधित व्यक्तींसाठीच्या यंत्रणेसह ) आणि संपर्क तपशिल याबाबत माहिती देणाऱ्या माहिती पत्रिका तयार केल्या आहेत. भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यांनी बाधित व्यक्तींसाठी एक स्थिरस्थावर तक्रार निवारण यंत्रणा उभारली असून ती कार्यान्वित केली आहे.

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम व मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचे पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण यातील उपजीविका पुन:स्थापना संबंधित तरतुदी लागू करण्यासह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुनर्वसन व पुनर्वसाहत केल्यानंतर उत्पन्न / उपजिविका गमावलेल्यांच्या गरजांचे मुल्यांकन करण्याचे प्रस्तावित केले आहे. यामध्ये असुरक्षित प्रकल्प बाधित व्यक्तींकडे विशेष लक्ष दिले जाईल आणि वरील तरतूदींनुसार मोबदला पुरेसा ठरत नसलयास आवश्यकतेनुसार त्यांच्या उपजिविका पुन:स्थापनेसाठी सहाय्य करण्याकरीता प्राधिकरण सुधारणात्मक उपायोजना राबवेल. याशिवाय, सुधारित सामाजिक परिणाम मुल्यांकन आणि पुनर्वसन कृती आराखडा अहवालाचा एक भाग म्हणून प्राधिकरण उपजीविका पुन:स्थापना उपाय ( प्राधान्याने उपजिविका आणि उत्पन्न पुन:स्थापना आराखडा स्वरुपात) विकसित करेल. या प्रकल्पासाठी प्राधिकरणाने एक लैंगिक समानता आणि सामाजिक समावेशन चौकट तयार केली असून या चौकटीनूसार करावयाच्या कृती मुख्यत: परिचलन प्रणालीशी संबंधित आहेत आणि त्यांची अंमलबजावणी भविष्यात सुरु होईल असे अपेक्षित आहे.

## १२) अंदाजपत्रक , संनियंत्रण आणि मूल्यमापन

पुनर्वसन कृती आराखडा अंमलबजावणीसाठी रु. ११,११९.४८ लाख इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक विकसित करण्यात आले आहे. अलीकडील काही काळापासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण एकाच वेळी अनेक मेट्रो रेल्वे प्रणालींची अंमलबजावणी करत असल्याने प्राधिकरणाकडे मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी कक्ष आणि त्याचाच एक भाग म्हणून पुनर्वसन व पुनर्वसाहत अंमलबजावणी कक्ष अशा सुस्थापित संस्थात्मक व्यवस्था कार्यरत आहेत आणि विशिष्ट अधिकाऱ्यांना प्रकल्प अंमलबजावणी आणि

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध आहे.

संनियंत्रण यांच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. पुनर्वसन कृती आराखडा अंमलबजावणीसह सहामाही संनियंत्रणासाठी बाह्य संनियंत्रण संस्था (external monitoring agency) नियुक्त करणे प्रस्तावित असून पुनर्वसन कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचे मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापन एका स्वतंत्र मुल्यमापन संस्थेकडून केले जाईल.

## १३) सामाजिक सुरक्षिततेविषयी विचारात घेण्याच्या प्रमुख बाबी

सामाजिक यथायोग्य पूर्व तपासणीमध्ये निदर्शनास आलेल्या व यासंबंधी विचारात घेण्याच्या पुढील प्रमुख बाबिंची नोंद घेण्यात आली आहे:-

[१] परिणामांमधील बदल, सर्व्हेक्षणातून आता उपलब्ध नवीन माहिती, उपजीविका आणि उत्पन्न पुन:स्थापना आराखड्याचा समावेश, बाह्य संस्थेद्वारे संनियंत्रणाची आवश्यकता इ. पार्श्वभूमिवर एशियन इन्फास्ट्रक्चर इनव्हेंस्टमेंट बँकेकडून घेतलेला आढावा आणि त्यांनी कळविलेले मुद्दे यांच्या आधारे सामाजिक परिणाम मूल्यांकन आणि पुनर्वसन कृती आराखड्याच्या मसुद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. याशिवाय, सामाजिक परिणाम मूल्यांकन आणि पुनर्वसन कृती आराखडा अहवालास अद्याप एशियन इन्फ्रास्ट्रक्चर  इनव्हेंटमेंट बँकेची मान्यता मिळायची असून त्याचे सार्वजनिक प्रकटीकरण झालेले नाही.

[२] ज्या प्रकल्प बाधित व्यक्तींना अजून पुनर्वसित केलेले नाही त्यांच्याशी अजूनपर्यंत सल्लामसलत व्हायची आहे. प्रकल्प बाधित व्यक्तींसाठी, आता माहिती पत्रिका तयार झाल्या आहेत, परंतु अजूनपर्यंत त्या प्रकल्प बाधित व्यक्तींना वाटायच्या राहिल्या आहेत.

[३] प्रकल्पासाठी आवश्यक बहुतांश सार्वजनिक जागा ताब्यात मिळाल्या आहेत किंवा त्यावर काम सुरू करण्याची परवानगीही मिळाली आहे. परंतू भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियमानुसार राबविली जाणारी बाधित खासगी जमिनींची संपादन प्रक्रिया (विशेषत: आगार आणि स्थानकांच्या प्रवेश, निर्गमणाच्या जागासाठी जमीन ) अजूनपर्यंत सर्व जागांसाठी पूर्ण व्हायची आहे, ज्याला गती देणे आवश्यक आहे.

[४] सुमारे ३७% (१०९) प्रकल्प बाधित व्यक्तींचे आधीच पुनर्वसन झाले आहे. त्यांच्या पैकी ४५ प्रकल्पग्रस्त संबंधित जमिनीचे संपादन होण्यापूर्वी अशा खासगी जमिनीवरुन अन्य ठिकाणी स्थानांतरित केले आहेत आणि वाणिज्य प्रकल्प बाधित व्यक्तींपैकी ८१% पुनर्वसीत व्यक्तींनी निवासी सदनिका स्विकारण्याचा पर्याय निवडला आहे. ही स्थिती विचारात घेता, जरी संबंधित प्रकल्प बाधित व्यक्तींनी त्यांचे पुनर्वसन पर्याय स्वत: निवडले असले तरी, अशा प्रकारे यापूर्वी पुनर्वसन केलेल्या प्रकल्प बाधित व्यक्तींकडून आणि भविष्यात पुनर्वसन केल्या जाणाऱ्या प्रकल्प बाधित व्यक्तींकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने औपचारीक लेखी संमतीपत्रे घेणे इष्ट राहील, जेणेकरुन भविष्यातील कोणतेही वाद टाळले जातील.

[५] कापूरबावडी येथील औपचारीक इमारतींमधील निवासी आणि वाणिज्य प्रकल्पबाधित व्यक्तींच्या नुकसानापोटी पुन:स्थापना खर्चाच्या तत्वावर मोबदला देता येईल आणि त्यांच्या उपजिविकेची पुन:स्थापना होईल याची खात्री देता येईल अशा प्रकारचे सुयोग्य पुनर्वसन पर्याय शोधणे, आणि इतर ठिकाणच्या वाणिज्य प्रकल्प बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी दुकानांची अपुरी उपलब्धता, ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासमोरची आव्हाने आहेत.

[६] एकीकडे लक्षणीय संख्या असलेल्या असुरक्षित प्रकल्प बाधित व्यक्ती दिसून आल्या आहेत आणि दुसरीकडे प्रकल्प बाधित व्यक्तींपैकी सर्वात मोठा गट असलेले वाणिज्य प्रकल्प बाधित व्यक्ती (२९२ पैकी १८४) त्यांचे उत्पन्न आणि उपजिविका गमावण्याची शक्यता असूनही, सामाजिक परिणाम मूल्यांकन आणि पुनर्वसन कृती आराखडा अहवालात त्यांच्यासाठी नेमक्या अशा उत्पन्न आणि उपजिविका पुन:स्थापना आराखड्याचा समावेश नाही.

[७] सामाजिक परिणाम मूल्यांकन आणि पुनर्वसन कृती आराखडा अहवाल तयार करण्याची जबाबदारी असलेला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सामाजिक विकास कक्ष आणि मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या अंतर्गत स्थापित भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अंमलबजावणी कक्ष हे बऱ्याच अंशी स्वतंत्रपणे काम करतात. पुनर्वसन कृती आराखड्याची अंमलबजावणी आणि संनियंत्रण व्यवस्थीत होण्यासाठी वरील दोन्ही कक्षादरम्यान अधिक चांगला समन्वय आणि विचारविनिमय होणे आवश्यक आहे.

---

कार्यकारी सारांशाची इंग्रजी आवृत्ती अंतिम आहे आणि कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत ती कायम राहील. इंग्रजी कार्यकारी सारांश https://mmrda.maharashtra.gov.in/sites/default/files/२०२३-१२/mmrda-mml५-p१-esddr-draft-११-sep-२०२३.pdf या ठिकाणी उपलब्ध आहे.

[८] पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी करण्यासाठी आवश्यक मूळ स्वरुपाची माहिती मिळविणे कठीण झाले. या बाबतीत भूतकाळात माहिती व्यवस्थापन करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न न झाल्याने अशी माहिती शोधावी लागली आणि त्याची जुळवणी करावी लागली.

[९] भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यांची प्रगती होत असली तरी अंतर्गत संनियंत्रण मुख्यत्वे केवळ आढाव्यापुरते सिमित आहे आणि पद्धतशीर अहवाल देखील तयार केले जात नाहीत. पुनर्वसन कृती आराखडा अंमलबजावणीसह सामाजिक सुरक्षितता विषयक स्वतंत्र संनियंत्रणाची यंत्रणा अजूनपर्यंत स्थापित केलेली नाही.

## १४) सुधारणात्मक कृती आराखडा – सामाजिक

भूसंपादन प्रक्रिया जरी प्रगतीपथावर असली आणि १०९ प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन झाले असले तरी, उरलेली स्थापत्य कामे (सुमारे २२%) करण्यासाठी भूसंपादनाची, विशेषत: आगाराची जमीन संपादित करण्याची, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होणे, औपचारिक इमारतींमधील घरे व दुकाने यांचे ताबेधारक असलेल्या तसेच मोठ्या संख्येने असलेल्या इतर वाणिज्य प्रकल्प बाधित व्यक्ती अशा १८३ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. प्राधिकरणाने अलिकडेच सर्वसाधारण जनता, आगारासाठीच्या जमिनीचे जागामालक, आणि विशिष्ट प्रकल्प बाधित व्यक्तींचे गट यांच्याशी सल्लामसलत करण्याबाबत लक्षणीय प्रगती केली आहे आणि प्रकल्प बाधित व्यक्तींसाठी माहिती पत्रिका देखील तयार केल्या आहेत. पर्यावरणीय आणि सामाजिक यथोचित पूर्वतपासणी अहवाल अंतर्गत प्रस्तावित केलेल्या सुधारणात्मक कृती आराखड्यात मुख्यत्वे सामाजिक यथोचित पूर्वतपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या व विशेषरुपाने विचारात घ्यावयाच्या बाबीसंबंधी करावयाच्या कृतींचा समावेश आहे. या कृती पुढील प्रमाणे आहेत [अ] प्रकल्प सामाजिक परिणाम मूल्यांकन आणि पुनर्वसन कृती आराखडा अहवालात सुधारणा करणे आणि ते अद्यावत करणे [ब] अद्याप ज्याचे स्थलांतर केलेले नाही अशा प्रकल्प बाधित व्यक्तींशी सल्लामसलत करणे [क] माहिती पत्रिकांचे वाटप करणे [ड] भूसंपादन कृतींची गती वाढविणे [इ] औपचारिक इमारतींमधील प्रकल्प बाधित व्यक्ती आणि वाणिज्य प्रकल्प बाधित व्यक्ती यांच्या पुनर्वसनात येणाऱ्या अडचणी सोडविणे [फ] उपजिविका आणि उत्पन्न पुन:स्थापना आराखडा तयार करणे आणि त्याचा

समावेश पुनर्वसन कृती आराखड्यात करणे [ग] अधिक चांगल्या संनियंत्रणासाठी अंतर्गत समन्वय सुधारणे [ह] माहिती व्यवस्थापनात सुधारणा करणे [ऐ] संनियंत्रण आणि मूल्यमापन यासाठी बाह्य संस्थेची नेमणूक करणे.